2015

क्रमांक :पोअवा/आलि./रजा रोखीकरण/२०१६-१७/ /२०१७, वाशिम. दिनांक :- 27 FEB 2017

**विषय :- वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करीता १५ दिवसाचे अर्जित रजेचा रोखीकरणाबाबत...**

-oooo-

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पोलीस कर्मचारी यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यांत यावे की, ज्यांची १५X१५ दिवसाची अर्जित रजा वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करीता रजा मंजुर करण्यांत आली आहे. ज्यांनी सदरची १५ दिवसाची अर्जित रजा उपभोगलेली आहे. अशा पोलीस कर्मचाऱ्यांचे १५ दिवसाचे रोखीकरण मंजुरीकरीता रजेवर सोडल्याचे दिनांक व हजर झाल्याचे दिनांक व स्टे., डायरीचे साना क्रमांकसह आपल्या मार्फतीने १५ मार्च २०१७ पर्यंत न चुकता सादर करावे, जर त्यांचे विनंती अर्ज १५ मार्च, २०१७ पर्यंत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास तर त्यांचे वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करीता १५ दिवसाचे अर्जित रजेचे रोखीकरण वित्तीय वर्ष २०१६-२०१७ संपल्यानंतर करता येणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच ज्या पोलीस कर्मचारी यांना वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करीता १५ दिवसाचे अर्जित रजा रोखीकरण रजा न भोगता घेणे आहे. व वित्तीय वर्ष २०१६-२०१७ मध्ये रोखीकरण घेतलेले नाही अशा पोलीस कर्मचाऱ्यांचे विनंती अर्ज आपल्या मार्फतीने या कार्यालयास दिनांक १५ मार्च, २०१७ पर्यंत या कार्यालयास न चुकता सादर करावे. तसेच ज्या कर्मचारी विनंती अर्ज प्राप्त होणार नाहीत. त्यांना वित्तीय वर्ष २०१६-२०१७ संपल्यानंतर त्यांचे वित्तीय वर्ष २०१६-२०१७ चे रोखीकरण मंजुर होणार नाही याची समज दयावी.

२/- सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे अर्जित रजेचे रोखीकरण सर्वांचे माहिती साठी पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असुन संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकारी/पोलीस स्टेशन शाखा/पोलीस मुख्यालय यांना ई-मेल द्वारे कळविण्यात येते जर कोणी कर्मचारी यांनी रजेच्या रोखीकरणा साठी अर्ज केला असेल त्यांचे रोखीकरण झाले की नाही याची खात्री संकेतस्थळावरुन व कार्यालयाकडून करुन घ्यावी. याबाबतची सुचना सदरचे परिपत्रक प्राप्त झाल्याचे ३ दिवसापासुन दररोज सकाळचे व संध्याकाळचे गणनेवर सर्व पोलीस कर्मचारी यांन वाचुन दाखवावे व तशी नोंद स्टेशन डायरी मध्ये घेण्यात यावी.

३/- तसेच जे पोलीस कर्मचारी सिक मध्ये गेले असतील अशा कर्मचाऱ्यांना सुचना देण्सात याव्या व अर्जित रजेवर गेलेल्या कर्मचाऱ्यांचा अर्जित रजेचा अहवाल प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास सादर करावा.

४/- सर्व ठाणेदार सर्व शाखा प्रमुख व रापोनि.,पोलीस मुख्यालय, वाशिम यांन कळविण्यांत येते की, वित्तीय वर्ष २०१६-१७ संपल्यानंतर प्राप्त होणा-या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याबाबत सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना समज देण्यात यावी.

(प्रशांत होळकर)
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

ठाणेदार, वाशिम शहर/वाशिम ग्रामीण/मालेगांव/शिरपुर/रिसोड/मंगरुळपीर/आसेगांव/अनसिंग/जऊळका/कारंजा शहर/ कारंजा ग्रामीण/मानोरा/धनज/पोनि.,शवाशा/जिवाशा/स्थागुशा/जिवीशा/पोअ.,वाचक शाखा/अपोअ.,वाचक शाखा/ मोपवि / मसुप/अमानी/बीडीडीएस पथक/कल्याण शाखा/तंटामुक्ती कक्ष/नियंत्रण कक्ष/श्वान पथक/बिनतारी संदेश/रापोनि, पोलीस मुख्यालय, वाशिम/संगणक कक्ष/डिपीजी लिपीक पो.अ.,कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे परिपत्रक हे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेतस्थळावर सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्या यावेत.

प्रत माहितीस :-

उपविभागीय पोलीस अधिकारी/वाशिम/मंगरुळपीर/कारंजा.

SHUKLA-2014-15 DAYS SURRENDER LEAVE